रविवार, दि. २१ जुलै २०२४ कृषीवल

# सर्वसामान्यांना मिळाले हक्काचे घर

## सिडकोच्या ३३२२ सदनिकांची सोडत जाहीर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४ करिता संगणकीय सोडत १९ जुलै रोजी सिडको भवन येथील सिडको सभागृहामध्ये यशस्वीरित्या पार पडली. सिडकोतर्फे २६ जानेवारी रोजी या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येऊन नवी मुंबईतील तळोजा आणि द्रोणागिरी नोड येथे परवडणाऱ्या दरातील ३३२२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.



याप्रसंगी महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४ मध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांचे सिडकोचे उपाध्यक्षतथाव्यवस्थापकीयसंचालक विजय सिंघल यांनी अभिनंदन केले. सदर संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे पर्यवेक्षक म्हणून मोईझ हुसेन आणि अर्जदारांपैकी तीन अर्जदार हे पंच म्हणून उपस्थित होते. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

सिडकोतर्फे वेगाने विकसित होत असलेल्या तळोजा आणि द्रोणागिरी नोडमध्ये ३३२२ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण गटातील नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तळोजा या नोडला सिडकोच्या नवी मुंबई मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. द्रोणागिरी हा जेएनपीटी बंदरालगतचा नोड असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होत आहेत. द्रोणागिरी नोडला नेरूळ-उरण रेल्वेद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळपासून द्रोणागिरी नोड हा नजीकच्या अंतरावर आहे. महागृहनिर्माण योजना जानेवारी-२०२४ च्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम लवकरात लवकर परत केली जाईल, असे जाहीर करण्यात आले.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

लोकमत मुंबई, रविवार, दि. २१ जुलै २०२४

# सिडकोच्या २४३ दुकानांचा उद्या होणार ई-लिलाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** सिडकोच्या बामणडोंगरी गृहप्रकल्पातील २४३ दुकानांची रखडलेला ई-लिलाव २२ जुलै रोजी घेण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. मे महिन्यात या दुकानांची ई-लिलाव प्रक्रिया घेतली होती. परंतु तांत्रिक कारणास्तव ती पूर्ण होऊ शकली नव्हती.

याआधी नोंदणी केलेल्या सर्व अर्जदारांना यात भाग घेता येईल. सिडकोने यावर्षी १४ मार्च रोजी बामणडोंगरी गृहनिर्माण संकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर केली होती. बंद निविदा सादर करण्याची मुदत २१ मे पर्यंत होती, तर २२ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत ई-लिलाव प्रक्रिया नियोजित केली होती. मात्र, तांत्रिक कारणास्तव ती पूर्ण होऊ शकली नव्हती. त्यामुळे अर्जदारांनी नाराजी व्यक्त करून पुन्हा ई-लिलाव प्रक्रिया राबविण्याची मागणी केली होती. २२ जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सिडकोच्या संकेतस्थळावर ती पार पडणार आहे. या योजनेचा निकाल २३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात येईल, असे सिडकोने स्पष्ट केले आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

# Cidco offers 48 plots on lease for residential and industrial activities

## 218 shops at Cidco hsg complexes will also be auctioned

B B Nayak
mirrorfeedback@timesofindia.com
TWEETS @MumbaiMirror

The City and Industrial Development Corporation (Cidco) has launched a grand scheme for leasing 48 plots in various nodes of Navi Mumbai for the construction of homes, bungalows, residential-cum-commercial complexes, service industries, and star hotels. In addition, 218 shops in various Cidco housing complexes are also on offer. While the online registration for the scheme for the sale of plots began last week, the registration for shops kicked off on July 16. This offer will certainly fulfill the dream of common citizens to own their houses, said Cidco.

According to Vijay Singhal, Vice Chairman and Managing Director of Cidco, "Cidco has consistently implemented schemes for the sale of plots, shops, and commercial premises to give a boost to the realty sector and commercial activities in the city. These schemes are proving helpful for strengthening the economy of Navi Mumbai and have given common citizens the golden opportunity to build their dream house (bungalow) in a city like Navi Mumbai. Also, various sections like developers, businessmen, small and medium entrepreneurs, have got an opportunity to expand their businesses."



The Cidco has already launched the online registration for the plot and shops schemes earlier this month

The 48 plots are available for sale in the nodes of Ghansoli, Nerul, CBD Belapur, Kharghar, Koparkhairane, Kalamboli, Panvel (E), and Panvel (W) through e-tender-cum-e-auction process for residential, bungalow, residential and commercial, commercial, service industry, and star hotels. The website https://eauction.cidcoindia.com/ has been made available for this scheme. Online registration can be done until July 23. The result of the scheme will be announced on July 25. Manohar Shroff, senior vice president of CREDAI-MCHI Navi Mumbai, said, "This is the biggest offer after last year's Diwali, and the plots will see good bidding."

Besides, 218 shops from Cidco's various housing complexes at Taloja, Kalamboli, Ghansoli, Kharghar, Dronagiri nodes along with the Swapnapoorti housing complex, have been made available for sale through e-tender-cum-e-auction processes. The website https://eauction.cidcoindia.com/ has been made available for the same. The results of the scheme will be announced on August 20. The plots and shops made available under these schemes are strategically located in rapidly developing nodes of Navi Mumbai.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

सोमवार, दि. २२ जुलै २०२४ सामना

# ३ हजार ३२२ भाग्यवंतांना नवी मुंबईत हक्काचा निवारा

## सिडकोने काढली तळोजा, द्रोणागिरीमधील घरांची सोडत

नवी मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) – सिडकोने याच वर्षी जानेवारीमध्ये जाहीर केलेल्या तळोजा आणि द्रोणागिरी येथील घरांची सोडत काढली आहे. त्यामुळे ३ हजार ३२२ भाग्यवंतांना नवी मुंबईत त्यांच्या हक्काचा निवारा मिळाला आहे. या गृहनिर्माण योजनेत सहभागी होण्यासाठी सिडकोने उत्पन्नाची मर्यादा वाढवली होती. त्यामुळे या योजनेला अर्जदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.



तळोजा आणि द्रोणागिरी गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये बांधून तयार असलेल्या घरांची विक्री करण्यासाठी सिडकोने जानेवारी महिन्यात गृहनिर्माण योजना जाहीर केली होती. या योजनेची सोडत काढण्यात आली आहे. ही सोडत प्रक्रिया सिडकोच्या बेलापूर येथील मुख्यालयातील सातव्या मजल्यावर असलेल्या सभागृहात पार पडली. याप्रसंगी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल उपस्थित होते. सोडत पर्यवेक्षक मोईझ हुसेन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सोडतीसाठी सिडकोने अर्जदारातून तीन पंच घेतले होते. सोडतीची प्रक्रिया पार पडल्यानंतर भाग्यवंत विजेत्या अर्जदारांची यादी सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. जे अर्जदार या सोडतीमध्ये अयशस्वी ठरले आहेत, त्यांची अनामत रक्कम लवकरच त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

### कागदपत्रांची पडताळणी

सोडत निघाल्यानंतर आता विजेत्या भाग्यवंतांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागणार आहे. त्यासाठी सिडकोने सिडको निवारा हे संकेतस्थळ निर्माण केले आहे. याच संकेतस्थळाच्या माध्यमातून विजेत्या अर्जदारांना कागदपत्र सादर करण्याची वेळ घेता येणार आहे. त्यानंतर कागदपत्रांची छाननी होऊन पात्र अर्जदारांना अलॉटमेंट पत्र देण्यात येणार आहे.

### नवीन लॉटरीकडे लक्ष

सिडकोने नवी मुंबईत मोठ्या संख्येने परवडणाऱ्या घरांची निर्मिती केली आहे. सुमारे ६० हजार घरांचे काम जवळपास पूर्णत्वास आले आहे. त्यापैकी मोठ्या संख्येने घरे खारघर, मानसरोवर, खांदेश्वर, जुईनगर, खारकोपर, द्रोणागिरी या भागात आहेत. या घरांची लॉटरी कधी जाहीर होणार याकडे नवी मुंबईत घराच्या शोधात असलेल्या कुटुंबांचे लक्ष लागले आहे. ही लॉटरी ऑगस्टमध्ये जाहीर होईल अशी चर्चा असली तरी सिडकोकडून मात्र आगामी लॉटरीबाबत कोणतीही घोषणा केलेली नाही.

लोकमत मुंबई, रविवार, दि. २१ जुलै २०२४

# सिडकोच्या ३३२२ घरांची सोडत अखेर पूर्णत्वास

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** मागील वर्षी स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर जाहीर केलेल्या सिडकोच्या गृह योजनेची संगणकीय सोडत अखेर शुक्रवारी पार पडली. नवी मुंबईतील तळोजा आणि द्रोणागिरी नोडमधील ३३२२ घरांचा या योजनेत समावेश होता. यावेळी यशस्वी अर्जदारांचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सिडकोच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोठ्या संख्येने घरे बांधली जात आहेत. यातील तळोजा आणि द्रोणागिरी नोडमध्ये यापूर्वी बांधलेल्या गृह प्रकल्पांतील तब्बल ३३२२ घरे शिल्लक राहिली होती. त्याची नव्याने सोडत जाहीर करण्यात आली होती. यात द्रोणागिरी नोड येथील ६१ व तळोजा नोड येथील २५१, याप्रमाणे ३२२ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी होत्या. तर द्रोणागिरी येथील ३७४ व तळोजातील २६३६, अशा एकूण ३०१० सदनिका सर्वसाधारण घटकांसाठी होत्या.



## कनेक्टीव्हीटीची सोय

- विविध कारणांमुळे या योजनेची सोडत रखडलेली होती. अखेर शुक्रवारी तज्ज्ञ पर्यवेक्षकांच्या उपस्थितीत शुक्रवारी ही संगणकीय सोडत पार पडली. तळोजा नोडला सिडकोच्या नवी मुंबई मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.
- **द्रोणागिरी हा जेएनपीटी बंदरालगत असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात वाणिज्यिक संधी निर्माण होत आहेत. येथे नेरुळ-उरण रेल्वेद्वारे कनेक्टिव्हिटीदेखील लाभली आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून द्रोणागिरी जवळ आहे.**
- या विभागातील घरे सोयीसुविधांनी युक्त असल्याचे सिडकोच्या संबंधित विभागाने स्पष्ट केले आहे. सोडतीतील यशस्वी अर्जदारांची यादी सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, रविवार, २१ जुलै २०२४ मुंबई तरुण भारत

# सिडकोच्या ३३२२ सदनिकांसाठी सोडत संपन्न



## महागृहनिर्माण योजना जानेवारी २०२४ ची संगणकीय सोडत

**नवी मुंबई, दि. २० : प्रतिनिधी**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना जानेवारी २०२४ करिता संगणकीय सोडत शुक्रवार, दि. १९ जुलै रोजी सिडको भवन येथील सिडको सभागृहामध्ये यशस्वीरीत्या पार पडली. सिडकोतर्फे दि. २६ जानेवारी २०२४ रोजी या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येऊन नवी मुंबईतील तळोजा आणि द्रोणागिरी नोड येथे परवडणाऱ्या दरातील ३ हजार, ३२२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या प्रसंगी महागृहनिर्माण योजना जानेवारी २०२४ मध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांचे विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अभिनंदन केले.

या संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे पर्यवेक्षक म्हणून मोईझ हुसेन आणि अर्जदारांपैकी ३ अर्जदार हे पंच म्हणून उपस्थित होते. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी-सुविधांनी परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी व्यक्त केली. सिडकोतर्फे वेगाने विकसित होत असलेल्या तळोजा आणि द्रोणागिरी नोडमध्ये ३ हजार, ३२२ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण गटातील नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तळोजा या नोडला सिडकोच्या नवी मुंबई मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. द्रोणागिरी हा जेएनपीटी बंदरालगतचा नोड असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होत आहेत. द्रोणागिरी नोडला नेरूळ-उरण रेल्वेद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून द्रोणागिरी नोड हा नजीकच्या अंतरावर आहे. सिडकोतर्फे गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीसाठी वापरण्यात येणारी प्रणाली (सॉफ्टवेअर) ही पूर्णतः मानवी हस्तक्षेपविरहित आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मुंबई येथील संगणक विभागाकडून या प्रणालीची तपासणी करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे काढण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांमधील निवडक प्रतिनिधींना पंच म्हणून सहभागी करून घेतले जाते. सोडती दरम्यान पात्र अर्जदारांच्या आणि सदनिकांच्या यादीचे यादृच्छिक पद्धतीने सरमिसळ करण्यात येते. अत्यंत पारदर्शक व निष्पक्ष अशा या प्रक्रियेद्वारे सर्व अर्जदारांना समान संधी सुनिश्चित करण्यात येते. महागृहनिर्माण योजना जानेवारी २०२४ च्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम लवकरात लवकर परत केली जाईल.